आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार दिनांक १३ डिसेंबर २०२४

ठळक बातम्या

- महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रयागराजमध्ये ७ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन.
- गदारोळामुळे आजही राज्यसभेच कामकाज दिवसभरासाठी तहकूब;लोकसभेत राज्यघटनेच्या अमृतमोहत्सवानिमित्त विशेष चर्चा सुरु.
- महाराष्ट्र राज्याला देशातील एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार असल्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास.
- खासदार सांस्कृतिक महोत्सवाचं आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि अभिनेत्री काजोल यांच्या उपस्थितीत उदघाटन.

महाकुंभ

प्रयागराजच्या भूमीवर एक इतिहास रचला जात असून महाकुंभ मेळ्याच्या आयोजनामुळे देशाची सांस्कृतिक आणि आध्यात्मिक ओळख एका नव्या उंचीवर पोहोचेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. प्रयागराजमध्ये पुढच्या वर्षी होऊ घातलेल्या महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ७ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं भूमिपूजन आज त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. भारत हा तीर्थक्षेत्रांचा आणि पवित्र नद्यांचा देश आहे. या नद्यांचं माहात्म्य, त्यांचा संगम म्हणजे प्रयाग आहे. प्रयोगराजचं वर्णन वेदांमध्ये केलं आहे, पावलोपावली पुण्यक्षेत्रं असलेलं हे एक आध्यात्मिक अनुभव क्षेत्र आहे, असंही मोदी यावेळी म्हणाले. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पायाभरणी झालेल्या प्रकल्पांमध्ये १०नवीन पूल, उड्डाणपूल, कायमस्वरूपी घाट आणि नदीसमोरच्या रस्त्यांचं बांधकाम या विकासकामांचा समावेश आहे.

राज्यसभा

राज्यसभेत आजही अध्यक्ष जगदीप धनखड यांच्यावरच्या अविश्वास ठरावाच्या मुद्द्यावरून विरोधकांनी प्रचंड गदारोळ केला. काँग्रेसप्रणित विरोधी पक्षांनी हा अविश्वास ठराव आणला असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये यावरून आजही

खडाजंगी झाली. गेल्या तीस वर्षात आणि आपल्या कार्यकाळात राज्यसभेच्या अध्यक्षांच्याविरोधात अशा किती नोटीस आल्या आहेत ते सभागृहासमोर यावं असं धनखड म्हणाले. विरोधी सदस्यांच्या वर्तनावर आणि त्यानी सभागृहाबाहेर केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. विरोधकांना त्यांच्याविरोधात प्रस्ताव आणण्याचा अधिकार आहे मात्र त्यांनी संविधानाचं उल्लंघन केलं आहे असं ते म्हणाले. विरोधकांचा ठराव १४ दिवसांनी घेतला जाईल. विरोधक वेळोवेळी घटनात्मक कामकाजाला टाळून अध्यक्षांच्या विरोधात मोहीम राबवत आहेत, अशी टीका त्यांनी केली. गोंधळ सुरूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज सोमवार सकाळपर्यंत स्थगित करण्यात आलं आहे.

लोकसभा-राजनाथ सिंग

देशाचं संविधान भारतीय नागरिकांनी तयार केलं असून ते भारताच्या मूल्यांवर आधारित आहे, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी आज लोकसभेत सांगितलं. देशानं राज्यघटना स्वीकारली त्या घटनेला ७५ वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त लोकसभेत आजपासून विशेष चर्चा सुरु झाली. या चर्चेला सुरुवात करताना संरक्षण मंत्री बोलत होते.

*सदियों की गुलामी के दलदल से बाहर आकर हमारे एक संप्रभु और लोकतांत्रिक गणराज्य का उदय हो चुका है. हमारा संविधान और उसमे पुकारी गयी आकृतिया हमारी सर्वोत्तम विरासत है. समृद्धता और महान परम्परा कि ये वाहक है. इसी परंपरा को हम विकास भी विरासत भी के भावना के साथ तेजी से आगे बढा रहे है.*

संविधान ही काही एका पक्षाची देणगी नसून काही पक्ष त्याचं श्रेय स्वतःकडे घेऊ पाहत आहेत, अशी टीका त्यांनी यावेळी केली. आपलं सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संविधानात अभिप्रेत असलेल्या तत्त्वांनुसार कार्य करत आहे, असं ते म्हणाले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रत्येक घटकाने दिलेलं योगदान अत्यंत महत्वाचं आहे,भारतीय संविधान हे भारताच्या प्राचीन वाद विवाद आणि संवादाच्या पारंपारीतून उभं राहील आहे, असं प्रतिपादन काँग्रेसच्या प्रियांका गांधी यांनी आज लोकसभेत संविधानावरील चर्चेच्या भाषणात केलं.

*हजारो साल पहले हमारे धर्म की एक पुरानी परंपरा रही है. ये परंपरा संवाद, चर्चा की रही है. ये वेदों में उपनिषदों मे भी दिखती है. वाद विवाद और संवाद कि हमारी पुरानी संस्कृति है. इसी परंपरा से उभरा हमारा स्वतंत्रता संग्राम है. यह संग्राम है एक अनोखी लड़ाई थी, जो अहिंसा और सत्य पर आधारित थी. एक बेहद लोकतांत्रिक लड़ाई थी. चाहे किसी भी जाति के हो, किसी भी धर्म के हो, किसी भी भाषा बोलते हो सभी इस स्वतंत्रता संग्राम में शामिल हुए.*

हिन्दू इकनॉमिक परिषद

गेल्या वर्षी राज्याच्या अर्ध्या ट्रिलियनचे उद्दिष्ट पार केलेले आहे. आता **2028** ते **2030** पर्यंत महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार आहोत असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्ल्ड हिन्दू इकनॉमिक परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात व्यक्त केला. भारतीय अर्थव्यवस्था पुरुषार्थ आणि कर्तृत्वाने वाढल्याची माहिती देताना ते म्हणाले कि...

*दुनिया कि जो बड़ी बड़ी अर्थव्यवस्था हम लोग देखते है, इन अर्थव्यवस्था के इतिहास में हम जायेंगे तो कही न कही शोषण नजर आता है. उपनिवेशवाद नजर आता है. लेकिन ये जो आर्थिक प्रगती भारतने कि है, कभी भी उपनिवेशवाद शोषण के भरोसे नहीं की. हमने कभी आक्रमण करके, लुटके, अपनी संपत्ती को बढाया नही. हमने हमारे अपने चिंतन, पुरुषार्थ के भरोसे अपनी संपत्ति को बढाया है.*

बिकेसी, वांद्रे इथं दिनांक १३ ते १५ डिसेंबर दरम्यान या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. 'मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच, मात्र येणाऱ्या काळात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल. वर्ल्ड हिंदू इकॉनोमिक परिषदेने भारताच्या संस्कृतीवर आधारित विकास करण्याच्या वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. हिंदू संस्कृतीमध्ये जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीला आपला विकास करण्याचा हक्क आहे , असं फडणवीस म्हणाले.

उद्धव ठाकरे

बांगलादेशमध्ये हिंदुंवर जे अत्याचार होत आहेत, त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषदेत केली. बांगलादेशमध्ये गेल्या काही दिवसांपासून हिंदूवर अत्याचार होत असल्याच्या बातम्या येत आहेत. तिथे इस्कॉनच्या प्रमुखांना अटक करण्यात आली. मंदिर सुरक्षित नाहीत. भारतातसुद्धा मंदिरे सुरक्षित नाहीत. निवडणुकीत हिंदूंनी मतदान केले आहे. भाजपला केवळ हिंदूंची मते निवडणुकीपुरती हवी आहे का ? असा सवालही त्यांनी यावेळी केला. या संदर्भात आमच्या पक्षाच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्याची वेळ मागितली होती मात्र त्यांनी दिली नसल्याने हा विषय पत्रकार परिषदेत मांडल्याचे ते म्हणाले.

हॅकेथॉन विजेते

नागपुरात जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयात पार पडलेल्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉन मध्ये नऊ राज्यातून वीस चमू सहभागी झाल्या होत्या. त्यात **120** मुलं आणि त्यांचे **24** मेंटर होते. त्यांना देण्यात आलेल्या ४ प्रॉब्लेम स्टेटमेंट वर त्यांनी आपल्या बुद्धिमत्ता आणि कौशल्याने समाधान शोधून काढले. या स्पर्धेतील ज्युरी पॅनेलने केलेल्या मूल्यांकनावर आधारित, कौशल्य विकास मंत्रालयाने दिलेल्या **4** समस्या विधानांसाठी विजेते घोषित केले गेले. विजेत्या संघांत श्री साईराम अभियांत्रिकी महाविद्यालय चेन्नई, व्यंकटेश्वरा कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग बंगलोर, एक्रोपोलिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च इंदूर आणि वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आंध्र प्रदेश यांचा समावेश आहे. ३६ तास चाललेल्या या स्पर्धेचा निकाल काल रात्री ८ वाजता घोषित करण्यात आला. अधिक माहिती देत आहेत डॉ.दिनेश पडोळे...

*पुरे कॉम्पिटिशन में, १२ जजेस का पैनल था. १२ तारीख शाम को ८ बजे विजेता घोषित किया गया. ४ अलग अलग प्रॉब्लम स्टेटमेंट के लिए विजेता 'घोषित किये गये. जैसे प्रॉब्लम स्टेटमेंट लॉजिस्टिक और ट्रान्सपोर्ट के लिए टीम टेक्निकल मावळे विजेता घोषित किये गए है. स्मार्ट एजुकेशन के लिए टीम प्रगती **AI** घोषित किया गया है ,टॉय **AND** गेम्स के लिए स्मार्ट शार्क घोषित किये गए है और स्मार्ट एजुकेशन के लिए हेलो वर्ल्ड टीम विजेता घोषित किये गए है। सब*

*विजेता को १ लाख प्राइज दिया गया था. ये मिनिस्ट्री ऑफ़ एजुकेशन ने डिसाईड किया है.*

खासदार सांस्कृतिक महोत्सव

खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या **9**व्या पर्वाला आज प्रारंभ होत आहे. हनुमाननगरातील क्रीडा चौक येथील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणात या कलागुणांचा संगम असलेल्या महोत्सवाचं प्रसिद्ध अभिनेत्री काजोल यांच्या हस्ते सायंकाळी उद्घाटन होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री आणि खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे प्रणेते केंद्रीय नितीन गडकरी राहतील. खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे देखील उपस्थित राहणार आहे. **23** डिसेंबरपर्यंत चालणा-या या महोत्सवात सकाळ आणि संध्याकाळ अशा दोन सत्रात धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची भरगच्च मेजवानी नागपूरकरांना मिळणार असून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कलाकारांसोबतच स्थानिक कलाकारदेखील या मंचावर आपली कला सादर करतील.जाहिराती, होर्डिंग्ज इत्यादी प्रसिद्धी साधनांवर असलेला 'क्युआर कोड' स्कॅन करून त्या-त्या दिवसाची मोफत पास प्राप्त करता येतील. याशिवाय, ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय, क्रीडा चौक इथं सकाळी **8** ते पासेस संपेपर्यंत आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या खामला येथील जनसंपर्क कार्यालयात सकाळी **11** ते दुपारी **2** यावेळात पासेस प्राप्त करता येतील.

हवामान

विदर्भात थंडीचा जोर कायम आहे. आज नागपुरात १०.४ अंश सेल्सियस इतक्या किमान तपमानची नोंद करण्यात आली. सलग तीन दिवस नागपुरातील तापमान १० अंशच्या दरम्यान आसपास आहे. गडचिरोली इथं किमान तापमान दहा अंश, गोंदिया इथं दहा पूर्णांक नऊ अंश, चंद्रपूर इथं ११.४ अंश तर वर्धा इथं ११.६ इतकं किमान तापमान होतं. तर पश्चिम विदर्भातील बुलढाणा, अकोला, अमरावती आणि वाशिम इथे किमान तापमान १२ ते १३ अंश सेल्सिअस दरम्यान राहिलं. दरम्यान मागील २४ तासांत सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं ३०.४ अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.

*****